महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

# GOVT. MEDICAL COLLEGE, NAGPUR

Email :- deangmc2@gmail.com Website:- gmcnagpur.org Phone No:- 0712-2701642

**क्रमांक**. कॉलेज/गट ड वर्ग-४/जाहिरात/आस्था-४/ /२०२३ **दिनांक**: /१२/२०२३

## :: जाहिरात ::

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय यांच्या अधिनस्त असलेल्या नागपूर जिल्हयातील शासकीय वैद्यकीय / दंत / आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयातील गट ड (वर्ग-४) संवर्गातील समकक्ष रिक्त पदे भरण्याकरीता ऑनलाइन (Computer Based Test) स्पर्धा परीक्षेसाठी अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहित नमुण्यात अर्ज मागविण्यात येत आहे. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, पदांचा तपशिल, शासनाच्या नियमानुसार संवैधानिक आरक्षण व समांतर आरक्षण, स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम आणि अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना इत्यादीची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संवर्ग | विभाग | वेतन श्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १ | गट ड (वर्ग-४) | नागपूर जिल्हयातील शासकीय वैद्यकीय / दंत / आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रूग्णालये | एस-१ : १५००० - ४७६०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते | ६८० |

२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या गट ड (वर्ग-४) संवर्गातील सर्व पदांचा सविस्तर तपशील (परिशिष्ट-१) https://gmcnagpur.org संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेला आहे.

३. **परिक्षा दिनांक** :- याबाबतची माहिती https://gmcnagpur.org संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत येईल. तसेच उमेदवारांच्या प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल.

३.१ प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून शासनाच्या ऑनलाइन प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहे

३.२ जाहिरातीची माहिती https://gmcnagpur.org या लिंकवर उपलब्ध आहे.

४. **पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी:-**

४.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल (कमी/वाढ) होण्याची शक्यता आहे.

४.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा / सूचनांच्या आधारे प्रस्तृत परिक्षेमधून भरावयाच्या पदाकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ प्रस्तुत जाहिरातीमये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत, तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रामध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल

(कमी/वाढ) होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या / अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त पदे परीक्षेचा निकाल अंतिम करतांना विचारात घेतली जाईल. यास्तव परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीचे संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

४.४ महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दि. ४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरती निवडीकरीता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.५ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.६ एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.७ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०१२/ प्र.क्र.१६/१२/१६-अ दि. १३ ऑगस्ट २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-१११८/प्र. क्र-३९/१६-अ, दि. १९ डिसेंबर २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.८ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन, विभाग क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि. १२ फेब्रुवारी, २०१९ व दि. ३१ मे २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४.९ शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१२/प्र.क्र. १८२/विजाभज-१, दि. २५ मार्च, २०१३ अन्वये विहित कार्यपध्दतीनुसार तसेच शासन शुध्दीपत्रक संबंधित जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

४.१० शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१३/प्र.क्र. १८२/विजाभज-१, दि. १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानूसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

४.११ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता

विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील कालावधी विचारात घेण्यात येईल.

४.१२ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषा संदर्भातील अटींची पुर्तता करण्याऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशी करीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जा मध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१३ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसामान्य रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसामान्य रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१४ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांका पूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

४.१५ सामाजिक व समांतर आरक्षणा संदर्भात विविध न्यायालया मध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

**४.१६ खेळाडू आरक्षण :-**

४.१६.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्र. क्र. ६८/क्रीसुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र. क्र. ६८/क्रीयुसे-२ दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शुध्दीपत्रक दि. १० ऑक्टोंबर २०१७, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र. क्र. १८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जुन, २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवतली संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१६.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१६.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, या विषयीच्या पडताळणी करीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणा करीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१६.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१६.५ परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्या बाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडी करीता पात्र ठरतो, या विषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी बाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस / नियुक्ती करीता विचार करण्यात येईल.

**४.१७ दिव्यांग आरक्षण :-**

४.१७.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र. क्र.११४/१६-अ दिनांक २९ मे, २०१९ तसेच या संदर्भात शासना कडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशा नुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१७.२ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०२१/प्र.क्र.५७/२१/वैसेवा-१ दि. १७ जून २०२१ नुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार गट ड (वर्ग-४) या संवर्गाची समकक्ष पदे दिव्यांग शासन सेवेसाठी सुनिश्चित केली आहे. सदर पदाचा तपशिल (परिशिष्ट-१) https://gmcnagpur.org संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेला आहे.

४.१७.३ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्ये पैकी असतील.

४.१७.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग / पदाकरीता पात्रता शासना कडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार राहील.

४.१७.५ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांका नुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

४.१७.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

४.१७.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

अ. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असल्यास नियमा नुसार अनूज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती.

ब. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमाण ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमा नुसार अनुज्ञेय सोयी सवलती.

४.१७.८ दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/ प्र. क्र. ४६/आरोग्य-६ दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशा नुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नविन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**४.१८ अनाथ आरक्षण :-**

४.१८.१ अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र./१२२/का-०३ दि. ६ एप्रिल २०२३, व समक्रमांकाचे शासन पूरक पत्र दि. १० मे २०२३, तसेच यासंदर्भात शासना कडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार राहील.

४.१८.२ महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागा कडील, शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३ दिनांक ०६ सप्टेंबर २०२२ तसेच दिनांक ६ एप्रिल २०२३, अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने अर्ज सादर करते वेळी महिला व बाल विकास विभागा कडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणे कडून वितरीत करण्यात आलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

४.१८.३ अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रूजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती पश्चात ६ महिन्याच्या कालावधीत आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांचेकडून अनाथ प्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी / विभाग प्रमुख यांची राहील.

४.१८.४ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्ते नुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

**४.१९ माजी सैनिक आरक्षण :-**

४.१९.१ गुणवत्ता यादी मध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्या कडून पडताळणी झाल्या शिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आरटीए-१०८२/३५०२/ सीआर-१००/१६-अ दि. २ सप्टेंबर १९८३ नुसार.

अ. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदां पैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

ब. युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५ टक्के आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापी, सदर उमेदवाराने गट ड (वर्ग-४) समकक्ष पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**४.२० प्रकल्प ग्रस्तांसाठीचे आरक्षण :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २० जानेवारी १९८० तसेच या संदर्भात शासना कडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशा नुसार प्रकल्प ग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. गुणवत्ता यादी मध्ये येणाऱ्या प्रकल्प ग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील प्रकल्प ग्रस्त असले बाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्प ग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालया कडून पडताळणी करून घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**४.२१ भूकंप ग्रस्तांसाठीचे आरक्षण :-**

गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या भूकंप ग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचे कडील भूकंप ग्रस्त असले बाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या भूकंप ग्रस्त उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालया कडून पडताळणी करून घेतले जाईल. सदर पडताळणी अंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे बाबतची कार्यवाही करण्यात येईल.

**४.२२ पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्या करीता आरक्षण :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पअंक-१००९/प्र. क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७.१०.२००९ व क्र. अशंका-१९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दि. १९/०९/२०१३ नूसार

शासकीय कार्यालया मध्ये ३ वर्षा पर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रा मध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालया कडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचे कडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**५. पदाच्या निवडीसाठी कार्यपध्दती, आवश्यक कागदपत्रे तसेच महत्वाच्या अटी व शर्ती (सर्व उमेदवारांसाठी) :-**

५.१ गट ड (वर्ग-४) समकक्ष पदासाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याचेकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

५.२ गट ड (वर्ग-४) समकक्ष पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय क्र.रिपभ/प्र. क्र.६६/२०११/ई-१० दि. १७ जून २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतू सदर शाळा सोडल्याच्या दाखल्या मध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म हा महाराष्ट्र राज्यात झाल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणाात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. ज्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतू महाराष्ट्र राज्यातील रहिवास सलग १५ वर्षे व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे अशा परीक्षार्थी / उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

**५.३ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.**

५.४ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना ज्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेल जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडी अंती सादर करणे आवश्यक आहे.

५.५ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६, दिनांक १२/१२/२०११ मधील तरतुदी नुसार, याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पूरते नियुक्त आदेश निर्गमित केल्याच्या दिनांका पासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

५.६ उमेदवारांना परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परीक्षेसाठी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळे पुर्वी १ तास अगोदर उपस्थित रहावे.

५.७ नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दि. २१/१०/२००५ नूसार लागु करण्यात आलेली नवीन परिभाषिक अंशदायी निवृत्ती वेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही. तथापी, सदर नियमात भविष्यात काही बदल झाल्यास त्या प्रमाणे योजना लागू राहील.

५.८ सदर भरती प्रक्रिया जिल्हा स्तरावरून एकत्रितरित्या राबविली जात असली तरी, सदर गट ड (वर्ग-४) समकक्ष संवर्गाची यादी तयार करताना त्या-त्या संस्थेत भरावयाच्या पदांचा विचार करून एकत्रित एक निवड यादी तयार करण्यात येऊन त्या नुसार उमेदवारास मिळालेल्या

गुणा नुसार समुपदेशानाच्या वेळी त्याने दिलेल्या विकल्पा नुसार त्या संस्थे करीता व समकक्ष पदा करीता विचारार्थ घेतले जातील. प्रत्येक संस्थे करीता स्वतंत्र निवड यादी जाहीर केली जाणार नाही.

५.९ उमेदवारांना ज्या संस्थेच्या गट ड (वर्ग-४) समकक्ष पदा करीता विकल्प देतील अशा पात्र उमेदवारांना संबंधित संस्थेतील गट ड (वर्ग-४) समकक्ष पदावर नियुक्तीसाठी कार्यक्षेत्र असणार आहे. निवड सुचीतील उमेदवार आवश्यक ती पात्रता पूर्ण करतील त्यांना कागदपत्रे पडताळणी अंती वैद्यकीय व चारित्र पडताळणी पूर्ण करून नियुक्तीपत्र देण्यात येतील. नियुक्ती बाबतचे सर्व अधिकार हे संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता यांना असतील.

५.१० अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राचे आधारे कागदपत्रे तपासणी वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारांना बंधनकारक राहील. त्या मधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.

## ६. शैक्षणिक अर्हता :-

६.१ जाहिराती मध्ये नमुद पदांसाठी अर्ज करणे कामी जाहिरात प्रसिध्दी दि.३०/१२/२०२३ रोजी उमेदवाराने पुढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता पुर्णतः धारण करणे आवश्यक आहे.

- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील दि. ६ जुन, २०१७ च्या अधिसूचने नुसार उमेदवार कोणत्याही शासन मान्यता प्राप्त माध्यमिक शालांत परीक्षा (१० वी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे
- मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.

**६.२ माजी सैनिकांच्या शैक्षणिक अर्हता :-.**

तांत्रिक अथवा व्यावसायिक कामाचा अनुभव आवश्यक ठरविलेल्या नसलेल्या पदांच्या बाबतीत १५ वर्षे सेवा झालेल्या माजी सैनिकांनी एस.एस.सी. उत्तीर्ण असल्याचे किंवा इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट एज्युकेशन अथवा तत्सम प्रमाणपत्र असल्यास ते अशा पदांना अर्ज करू शकतात.

## ७. पात्रता :-

७.१ भारतीय नागरिकत्व

७.२ **वयोमर्यादा**

७.२.१ वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- दिनांक ३०/१२/२०२३

७.२.२ विविध अराजपत्रित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी किमान व कमाल वयोमर्यादा :-

| अ. क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दि. २५ एप्रिल २०१६ मधील तरतुदी नुसार किमान १८ वर्षा पेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| २ | मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दि. २५ एप्रिल २०१६ मधील तरतुदी नुसार किमान १८ वर्षा पेक्षा कमी व ४३ वर्षा पेक्षा जास्त नसावे.<br>तथापी उन्नत व प्रगत गटां मध्ये क्रिमीलेयर (Creamy Layer) मोडणाऱ्या वि.जा-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, विमा.प्र, इ.मा.व., एस.ई.बी.सी. आणि ई. डब्ल्यु.एस (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) प्रवर्गातील उमेदवारांना ही वयाची सवलत लागू राहणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | पदवीधारक अंशकालीन उमेदवारांसाठी | शासन सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र.अशंका-१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ दि. २ जानेवारी २०१९ मधील तरतूदी नुसार, कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष राहील. |
| ४ | स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतर निवडणूक कर्मचारी यांचेसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र. निवक १०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ दि.०६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखील उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. |
| ५ | खेळाडू उमेदवारांसाठी | शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागा कडील शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र/६८/क्रीयुसे-२ दि. १/७/२०१६ मधील तरतुदी नुसार, खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेण्यात सदर पदासाठी असलेल्या विहीत वयोमर्यादेत ०५ वर्षा पर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. तथापी, उच्चतम वयमर्यादा ४३ इतकी राहील. |
| ६ | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६/६/२००१ मधील तरतुदी नुसार, उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्ष इतकी राहील. तथापि, दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान दिव्यंगत्वाचे प्रमाण ४० टक्के असल्या बाबतचे स्थायी वैज्ञकिय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यापुर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैज्ञकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करू शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे. |
| ७ | प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र.प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि. ३/२/२००७ मधील तरतुदी नुसार, कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनाही कमाल वयोमर्यादे बाबत ४५ वर्षापर्यंतची सवलत राहील. |
| ८ | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ दि. २०/८/२०१० मधील तरतुदी नुसार माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्ष इतकी राहील. तसेच, दिव्यांग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील. |

- तथापि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय सनिव २०२३/प्र.क्र. /१४/कार्या-१२ दि. ३ मार्च २०२३ अन्वये दि. ३१ डिसेंबर २०२३ पुर्वी प्रसिध्द होणाऱ्या भरती जाहिराती करिता कमाल वयोमर्यादेच्या दोन वर्षे शिथिलता दिलेली असल्याने वर नमूद सर्व प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादेच्या दोन वर्षे इतकी शिथिलता असेल

* परीक्षेचे स्वरूप व त्या अनुषंगिक सूचना

| अ. क्र. | पदाचे नांव | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बौध्दिक चाचणी / अंकगणित | | एकुण गुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| १ | गट ड (वर्ग-४) समकक्ष पदे | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | १०० | २०० |

* परीक्षा कालावधी :- २ तास (१२० मिनिटे)

❖ **परीक्षेचे स्वरूप :-**

१) परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पध्दतीने घेण्यात येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक ०२ गुण ठेवण्यात येतील.

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र. ५४/का १३-अ दि. ४ मे २०२२ मधील तरतुदी नुसार गट ड (वर्ग-४) समकक्ष पदासाठी माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) हि कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. मराठी व इंग्रजी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या (एस.एस.सी.) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावर प्रश्ना करीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकुण २०० गुणांची ऑनलाईन (Computer Based Test) परीक्षा घेण्यात येईल.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ४ मे २०२२ मधील तरतुदी नुसार या पदां करीता मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाहीत.

४) उमेदवारांची निवडसूची तयार करणेसाठी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६/३/१९९९ आणि शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण ११९९/ प्र.क्र.३९/१६-अ, दि. १९/१२/२०१८ तसेच शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ४ मे २०२२ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ४ मे २०२२ मधील तरतुदी नुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

६) परीक्षेचा निकाल (निवडसुची) तयार करतांना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ४ मे २०२२ मध्ये नमुद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.

परीक्षा ही Computer Based Test ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. सत्र १ ते अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व त्याची काठिण्यता तपासण्यात येऊन त्याचे समानीकरण करणेचे (Normalization) पध्दतीने गुणांक निश्चित करून निकाल जाहीर करणेत येईल. (Normalization) बाबत IBPS कंपनीकडून देण्यात आलेले सुत्र वेबसाईटवर माहितीसाठी प्रकाशित केलेला आहे. सदर (Normalization) सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील. याची सर्व परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

८. **विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे संलग्न (Upload) करणे :-**

एक) प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने परीक्षे करीता अर्ज सादर करतांना खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्प ग्रस्त, भुकंप ग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे PDF फाईल फॉरमॅट मध्ये संलग्न (Upload) करावीत.

दोन) विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांची पात्रता आजमावल्या नंतर (Check Eligibility) उमेदवार जाहिराती नुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करतांना खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) संलग्न (Upload) करणे अनिवार्य आहे.

| अ. क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्र | अ. क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्र |
|---|---|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | १० | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| २ | वयाचा पुरावा | ११ | प्रकल्प ग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | १२ | भुकंप ग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| ४ | सामाजिक दृष्टया मागासवर्गीय असल्या बाबतचा पुरावा | १३ | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| ५ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटक असल्या बाबतचा पुरावा | १४ | एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा |
| ६ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | १५ | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.व, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | १६ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | | |
| ९ | खेळाडू आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा | | |

तीन) उपरोक्त प्रमाणपत्र / कागदपत्रे https://gmcnagpur.org संकेतस्थळा वरील उपलब्ध लिंकवर उमेदवारांना सर्वसाधारण सुचना मध्ये प्रस्तुत जाहिराती मध्ये नमुद केल्या प्रमाणे असणे अनिवार्य आहे.

चार) खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ तसेच प्रकल्प ग्रस्त, भुकंप ग्रस्त व पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी / नियुक्तीच्या वेळेस सादर केल्याशिवाय नियुक्ती दिली जाणार नाही.

९. **सर्वसाधारण सूचना :-**

एक) अर्ज फक्त ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

दोन) उमेदवारास फक्त एकच अर्ज सादर करता येईल. वेगवेगळया संस्थे करीता वेगवेगळे अर्ज सादर करता येणार नाहीत. एका पेक्षा जास्त संस्थे करीता अर्ज सादर केल्यास असे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

तीन) अर्ज सादर करण्या करीता संकेतस्थळ :- https://gmcnagpur.org

चार) अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://gmcnagpur.org या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

पाच) अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्या शिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

सहा) अर्ज भरण्याची व परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख संगणका मार्फत निश्चित केली असल्याने पेमेंट गेटवे दिलेल्या तारखेला व वेळेला बंद होणार आहे. त्यामुळे परीक्षार्थी उमेदवारांनी मुदतीतच अर्ज व परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.

**९.१ केंद्र निवडः-**

९.१.१ प्रस्तुत परीक्षे करीता परीक्षा केंद्राचा तपशील https://gmcnagpur.org संकेत स्थळावरील सदर परीक्षेच्या परीक्षा योजना / पध्दती या सदरा मध्ये उपलब्ध आहे.

९.१.२ परीक्षा केंद बदला बाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**९.२ परीक्षा शुल्काचा भरणा :-**

९.२.१ परीक्षा शुल्क (फी)

| **अ. क्र.** | **पदाचे नाव** | **आवश्यक परीक्षा शुल्क** | |
|---|---|---|---|
| | | **खुला प्रवर्ग** | **राखीव प्रवर्ग (मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्टया दुर्बल घटक)** |
| १ | गट ड (वर्ग-४) समकक्ष | १०००/- | ९००/- |

माजी सैनिकांना परिक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

९.२.२ परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

९.२.३ अर्ज सादरीकरणाचे टप्पे पूर्ण झाल्यावर उपलब्द होणाऱ्या Submit बटनावर क्लिक केल्यानंतर Pay Fees या बटनावर क्लिक केल्यानंतर किंवा मुखपृष्ठावरील माझे खाते या सदराखालील अर्ज केलेल्या पदाच्या यादीतील Fees Not Paid अशी सद्यस्थिती लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षे समोरील Pay now या लिंकवर क्लिक करून परीक्षा शुल्काचा भरणा करता येईल.

९.२.४ **परीक्षा शुल्काचा भरणा खालील पध्दतीने करता येईल -**

**ऑनलाईन पध्दतीने :-**

१) परीक्षा शुल्काचा भरणा प्रणालीद्वारे उपलब्ध करून दिलेल्या पेमेंट गेटवेच्या माध्यातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगद्वारे परीक्षा शुल्क अदा करता येईल.

२) परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यातून परीक्षा शुल्काची रक्कमेची वजावट झाल्यानंतर परीक्षा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश - ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्या शिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार झाल्या शिवाय संकेतस्थळा वरील संबंधित पृष्ठावरून आणि / अथवा खात्यातून लॉग आऊट होऊ नये.

३) परीक्षा शुल्काचा भरणा केल्या नंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (Status) लगेचच अवगत होईल. खात्यातून Logout होण्या पुर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्या बाबत व बँके कडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्या बाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची आहे.

४) परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने विहीत दिनांक / विहित वेळे पूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली

जाणार नाही. विहीत मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करू न शकणाऱ्या उमेदवारांचा संबंधित भरती प्रक्रिये करीता विचार केला जाणार नाही.

**९.२.५ अर्ज सादर करण्याची प्रक्रिया / कालावधी :-**

| अ. क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. ३०/१२/२०२३ रोजीपासुन<br>दि. २०/०१/२०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. २०/०१/२०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| ३ | परीक्षेचा दिनांक व कालावधी | https://gmcnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल तसेच उमेदवारांच्या प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल. |

**१०. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधी बाबत :-**

१०.१ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्या संदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क २, दिनांक ५ ऑक्टोंबर २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या बाबत ऑनलाईन परीक्षा घेण्या बाबतची मार्गदर्शिका - २०२१ तसेच तद्नंतर शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशा नुसार कार्यवाही करण्यात येईल.

१०.२ प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्याच्या दिनांका पासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांसह विहित नमुन्या मध्ये या कार्यालयाकडे लेखी विनंती करून पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१०.३ लेखनिकाची व्यवस्था उमेदवारां कडून स्वत: केली जाणार आहे की कार्यालया मार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरून ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जा मध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

१०.४ अर्जा मध्ये मागणी केली नसल्यास तसेच शासनाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

१०.५ परीक्षे करीता लेखनिकाची मदत आणि / अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, तसेच लेखनिकाची मदत आणि / अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगी बाबत संबंधित उमेदवाराला नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

१०.६ प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्या पुर्वी कार्यालयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारां करीता मार्गदर्शक सुचनाचे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

## ११. निवड सुचीची कालमर्यादा :-

अ. निवड समितीने तयार केलेली निवड सुची १ वर्षासाठी किंवा निवड सुची तयार करताना ज्या दिनांका पर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांका पर्यंत, या पैकी जे नंतर घडेल त्या दिनांका पर्यंत विधी ग्राहय राहील. तद्नंतर ही निवड सुची व्यपगत होईल. भरती प्रक्रिये दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवड सूची, प्रतिज्ञा सुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

ब. निवड समितीने तयार केलेल्या निवड सुचीमधुन ज्येष्ठते नुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्या नंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रूजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदी नुसार, किंवा जात प्रमाणपत्र / अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजू झाल्या नंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्या मुळे किंवा त्याच्या मृत्यु झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या-त्या प्रवर्गाच्या निवड सुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारां मधुन निवड सुचीच्या कालमर्यादेत वरिष्ठते नुसार उतरत्या क्रमाने भरण्यात येतील. तथापी, भरती प्रक्रिये दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने भरती प्रक्रिया, निवड सुची, प्रतिक्षा सुची इत्यादीचे अनुषंगाने दिलेले निर्देश तथा सुचना किंवा सुधारणा यथास्थितीत लागू राहतील.

## १२. प्रवेश प्रमाणपत्र :-

१२.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेत स्थळावर https://gmcnagpur.org उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षे पुर्वी सर्वसाधारणपणे १० दिवस अगोदर उपलब्ध करून देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षे पूर्वी डाऊनलोड करून प्रिंट काढून परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्या शिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२.३ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आल्या नंतर उमेदवाराला त्याच्या अर्जात नमुद नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. या बाबतची घोषणा कार्यालयाच्या संकेत स्थळावर परीक्षे पूर्वी एक आठवडा आगोदर प्रसिध्द करण्यात येईल.

१२.४ परीक्षेच्या दिनांका पूर्वी ३ दिवस अगोदर प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह संबंधित कार्यालयाच्या मदत कक्षाकडे संपर्क साधावा.

१२.५ परीक्षेच्या वेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी किमान कोणतेही एक **मुळ ओळखपत्र** तसेच मुळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१२.६ आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेत स्थळावरून डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवारांचे नांव, पत्ता, लिंग, फोटो, जन्म दिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhar Generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंटमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

१२.७ नावा मध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रिया यांच्या बाबतीत) नावांत बदल झाल्या संबंधी अधिसुचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्या कडून नावात बदल झाल्या संबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३. परीक्षेस प्रवेश :-**

संबंधीत परीक्षेच्या प्रवेश प्रमाणपत्रावर नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून उमेदवारांना परीक्षेच्या उपस्थितीसाठी पात्र समजण्यात येईल. तथापि, परीक्षा सुरू होण्या पुर्वी नेमुन दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळे पुर्वी २ तास अगोदर ओळख तपासणीची पुर्तता करण्यासाठी उपस्थित राहावे लागेल.

१४. कोणत्याही परिस्थिती मध्ये परीक्षा सुरू झाल्या नंतर उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. अशा उमेदवारांना पुनर्परीक्षा देण्याची कोणतीही व्यवस्था केली जाणार नाही.

१५. प्रस्तुत जाहिराती मध्ये परीक्षे संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयो मर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा पध्दती, अभ्यासक्रम इत्यादी बाबतचा सविस्तर तपशीलासाठी संस्थेचे https://gmcnagpur.org **या संकेत स्थळावरील उमेदवारां करीता माहिती - विभागातील सुचना - अंतर्गत - सर्वसाधारण सुचना - तसेच परीक्षा या** सदरा खालील गट ड (वर्ग-४) समकक्ष संवर्ग परीक्षा मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

१६. संस्थेचे https://gmcnagpur.org संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती / जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

१७. सदर जाहिरात संस्थेच्या https://gmcnagpur.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**ठिकाण : नागपूर**

**दिनांक : २७/१२/२०२३** **स्वाक्षरी**

**(डॉ. राज गजभिये)**
**सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा**
**अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**नागपूर**

| |
|---|
| १. कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. |
| २. प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रते संदर्भातील सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस / नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही. |

# गट ड (वर्ग-४) समकक्ष रिक्त पदे भरण्या करीता जाहिरातीचे
## "परिशिष्ट-१"

१) कार्यालय/विभाग आणि पत्ता : वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागाच्या अधिनस्त असलेले नागपूर जिल्हातील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालये.

२) पदाचे नांव : गट ड (वर्ग-४) समकक्ष पद

३) नामनिर्देशनाने भरावयाचा पदांची संख्या : ६८०

४) पदांचा आरक्षणाचा तपशील :

| प्रवर्ग | | पद संख्या | सर्व साधारण | महिला ३०% | मा. सैनिक १५% | पदविधर अंशकालीन १०% | खेडाळू ५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भुकंपग्रस्त २% | दिव्यांग ४% | अनाथ १% | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | | ६८० | | | | | | | | | | ६८० |
| १ | अ.जाती (१३%) | १०० | २९ | ३१ | १४ | ११ | ५ | ५ | १ | ३ | १ | १०० |
| २ | अ.जमाती (७%) | ५४ | १८ | १६ | ८ | ६ | २ | २ | १ | १ | ० | ५४ |
| ३ | वि.जा. (अ) (३%) | ३१ | १३ | ९ | ४ | २ | १ | १ | ० | १ | ० | ३१ |
| ४ | भ.ज. (ब) (२.५%) | १९ | ८ | ६ | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | १९ |
| ५ | भ.ज. (क) (३.५%) | ३७ | १६ | १० | ५ | ३ | १ | १ | ० | १ | ० | ३७ |
| ६ | भ.ज.(ड) (२%) | १९ | ८ | ६ | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | १९ |
| ७ | वि.मा.प्र. (२%) | १९ | १२ | ५ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १९ |
| ८ | इ.मा.व (१९%) | १६० | ४६ | ४८ | २५ | १५ | ८ | ८ | ३ | ६ | १ | १६० |
| ९ | आ.दु.घ. (१०%) | ७३ | २४ | २३ | १० | ७ | ३ | ३ | १ | २ | ० | ७३ |
| १० | अराखीव (३८%) | १६८ | ५० | ५० | २४ | १७ | ८ | ८ | ३ | ७ | १ | १६८ |
| एकुण (१००%) | | ६८० | २२४ | २०४ | ९५ | ६४ | ३० | ३० | ९ | २१ | ३ | ६८० |

**( दिव्यांग प्रवर्ग ) या दिव्यांग प्रर्वगातील दिव्यांग अर्ज करु शकतील :-** B - Blind, LV - Low Vision, D - Deaf, HH - Hard Hearing, OL - One Leg, OAL - One Arm and One Leg, CP - Cerebral Palsy, LC - Leprosy Cured, OA - One Arm, MDy - Muscular Dystrophy, DW - Dwarfism, AAV - Acid Attack Victim, ASD - Autism Spectrum Disorder (M-Mild, MoD- Moderate), ID - Intellectual Disability, SLD - Special Learning Disability, MI - Mental Illness, MD - Multiple Disabilities, BL - Both Leg, BA - Both Arm.

**Note:- Above Reservation mention in this chart is calculated on the basis of data provided by the Institutes. ( GMC, GMCH, IGMC, IGMCH, RHTC (SAONER) ,GDCH, GMCSSH, GAC, GAH )**

**टिप :- उपरोक्त नमूद आरक्षणाची गणना ही सर्व संस्थानी दिलेल्या माहितीच्या आधारावर संकलीत करुन नमूद करण्यात आलेली आहे.**

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर २) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर ३) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, ४) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर ५) ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र, सावनेर ६) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर ७) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर ८) शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर ९) शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर




To get the latest jobs alert on your mobile

Please Join our WhatsApp group